# दान

पाण्याचा हा डोह अथांग
एकही ना वरी तरंग
खोल तुझेही अंतरंग
नच परी वरूनी थांग

लपवते तू दुःख तुझे
भरभरून सुख देते
चंदनापरी तू झिजते
गंध मात्र पसरवते

भाग्य माझे फळफळले
न देताच सारे मिळाले
तू मात्र न घेताच दिले
दानच कर्तव्य मानले

– नारायण
११/२०/२३